अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# वशिलेबाजीच्या चिखलात पद्मपुरस्कार

देशातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्यांना पद्मश्री, पद्मभूषण किंवा पद्मविभूषण असे पुरस्कार देऊन गौरविले जाते. गेल्या काही वर्षापासून प्रतिष्ठेचे मानले गेलेले हे पुरस्कार वादग्रस्त होत चालले आहेत. पंचवीस वर्षांपूर्वी हे पुरस्कार देण्याबाबतचे निकष जास्तीत जास्त पाळले जात होते. समाजात ज्यांनी खरोखरच वैशिष्ट्यपूर्ण काम केले अशांना अचूकपणे निवडले जात होते. काही प्रमाणात दोन-चार नावे त्या यादीत घुसविली जायची. तरीदेखील अधिकाधिक कर्तृत्ववान लोकांना हा सन्मान राष्ट्रपतींच्या हस्ते बहाल केला जायचा. आता मात्र ही सगळे पदे किंवा सन्मान जणू काही बाजारात विक्रीला आहे की काय? अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. गेल्या १०-१५ वर्षांची यादी काढून पाहिली तरी त्यातले १०-१५ टक्के लोकांचे कोणतेही मोठे योगदान नसताना ते पुरस्कार दिले गेल्याचे आढळून येईल किंवा ते हे पुरस्कार खिशात घालण्यात यशस्वी झाले असे म्हणता येईल. पद्मश्री, पद्मभूषण किंवा पद्मविभूषण नेमके कोणाला दिले जावेत, त्यांची पात्रता काय असावी, याबाबतचे कोणतेही निश्चित नियम नाहीत. हा सन्मान देताना काही गोष्टींचे काटेकोरपणे पालन व्हावे, असाही आग्रह दिसत नाही. साधारणपणे गृहमंत्रालयाने किंवा पंतप्रधान कार्यालयाने तसेच प्रत्यक्ष राष्ट्रपतींनी निवडलेल्या काही व्यक्तींना हा सन्मान दिला जातो. परंतु, त्यातही संबंधित व्यक्तींचे समाजातले स्थान काय आहे, त्याने सामाजिक किंवा एकूण राष्ट्रीय कामांमध्ये कोणते कार्य केले आहे, अथवा आपापल्या क्षेत्रामध्ये काही विक्रम केले आहेत किंवा नाही याची माहिती घेतली जाते. त्याच्या कर्तृत्वाचा सन्मान करीत असताना समाजासमोर काही आदर्शही ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र अलिकडे ज्यांची राजकारण्यांकडे उठबस असेल, ज्यांचे सत्ताधाऱ्यांशी चांगले संबंध असतील, जे सत्ताधाऱ्यांच्या उपयोगी पडणारे असतात किंवा उपयोगी पडू शकतात अशांची या पुरस्कारांसाठी वर्णी लावली जाते. गेल्या काही वर्षांपासून तर नावलौकिक मिळविलेले आणि ज्यांना असे पुरस्कार यापूर्वी मिळालेले आहेत ते लोकदेखील आपल्या नातेवाईकांना हा पुरस्कार मिळावा म्हणून लाजिरवाणी धडपड करताना दिसतात. ज्यांच्याकडून अशाप्रकारची अजिबात अपेक्षा नाही ते राजकारणी किंवा समाजातले नामवंत गायक कलाकारसुध्दा आपल्या नातेवाईकांसाठी शिफारस करतात. त्यावेळी आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही.

### इच्छुकांची भाऊगर्दी

दरवर्षी साधारणपणे शंभर एक लोकांना पद्मश्री, पद्मभूषण किंवा पद्मविभूषण हे पुरस्कार दिले जातात. परंतु यासाठी तब्बल हजारांपेक्षा जास्त शिफारशी गृहमंत्रालयाकडे किंवा राष्ट्रपतीभवनात पाठविल्या जातात. विशेषत:, सत्ताधारी पक्षातील अनेक नेते २५-२५ नावांच्या शिफारशी पाठवित असतात. मंत्र्यांकडून सुचविली जाणारी नावे अनेक वेळा विचारात घेतली जातात. परंतु, समाजातले नामवंत कलाकार ज्यावेळेला आपल्या नातेवाईकांना हा पुरस्कार मिळावा म्हणून पत्र पाठवितात त्यावेळेला मात्र या पुरस्कारांभोवती वशिला लावणाऱ्यांचा गोतावळा जमला आहे, असेच चित्र निर्माण होते. हे पुरस्कार कसे मिळवावेत, त्यासाठी कोणाच्या भेटीगाठी घ्याव्यात किंवा कोणता दबाव टाकला म्हणजे पुरस्काराचे काम होते हेदेखील ठरून गेल्यासारखे आहे. दिल्लीत पद्मपुरस्कार मिळवून देणारी काही मंडळी काम करीत असल्याचे सांगितले जाते. शेवटी गुणवत्ता किंवा समाजातले उल्लेखनीय कार्य यापेक्षाही राजकीय लागेबांधे या पुरस्कारासाठी जास्त महत्त्वाचे ठरू लागले आहेत. राजकारणी लोकांचे स्वार्थ वेगळे असतात. त्यांना आपले हित साध्य करायचे असते. त्यासाठी त्यांना फारसा विचार करण्याची गरजच उरत नाही. मात्र अलिकडेच प्रसिध्द झालेल्या एका बातमीनुसार प्रसिध्द गायिका लता मंगेशकर यांनी आपली बहीण उषा मंगेशकर यांना हा पुरस्कार मिळावा म्हणून शिफारस केल्याचे समोर आले आहे. तर प्रसिध्द सरोदवादक अमजद अली खान यांनी आपल्या मुलांना हा पुरस्कार दिला जावा म्हणून शिफारस केल्याचे उघड झाले आहे. खरे तर ही दोन्ही नावे अशी आहेत की ज्यांना भरपूर पुरस्कार मिळालेले आहेत. उषा मंगेशकर हे नावसुध्दा गायन क्षेत्रामध्ये रसिकमान्य झालेले आहे. अमजद अली खान यांच्याप्रमाणे त्यांच्या मुलांनाही आज ना उद्या हे पुरस्कार मिळू शकतील त्यासाठी त्यांनी आपला शब्द खर्च करण्याची काहीच गरज नव्हती. परंतु पद्मपुरस्कारांचा पगडा इतका जबरदस्त आहे की, मोठमोठी मंडळीदेखील त्याच्या मोहात पडतात.

### कलावंतही बळी पडले

पद्मपुरस्कार मिळविण्यासाठी दरवर्षी जोरदार मोर्चेबांधणी होत असते. त्यात राजकारणी नेहमी आघाडीवर असतात. २०१३ च्या पद्मपुरस्कारांकरिता मंगेशकर कुमार, खान यांनी शिफारशी केल्या तसेच काँग्रेसचे सरचिटणीस मोतीलाल व्होरा यांनी तब्बल २५ नावांच्या पत्रांचा गठ्ठा पाठविला होता. तर समाजवादी पार्टीचे माजी नेते अमर सिंह यांनी अभिनेत्री जयाप्रदा हिच्या नावाची शिफारस केली होती. ही सगळी उदाहरणे पद्मपुरस्कारांचे कसे बाजारीकरण झाले आहे याचेच निदर्शक ठरतात. म्हणजेच हे पुरस्कार मिळालेल्या यादीमध्ये किमान १०-१५ टक्के नावे अशी असू शकतात की, जी वशिला लावून पुरस्कार मिळविण्यात यशस्वी होतात. संपूर्ण देशात अत्यंत मानाचा समजल्या जाणाऱ्या या पुरस्काराचा दर्जा जर अशा पध्दतीने खाली घसरत असेल तर ते अत्यंत शोचनीय म्हटले पाहिजे. पुरस्कारासाठी चालणारी केविलवाणी धडपड पुरस्कारांचे महत्त्व कमी करीत आहेत. कोणालाही हा पुरस्कार मिळविता येऊ शकतो असे चित्र आज निर्माण झालेले आहे. वशिलेबाजीच्या चिखलाने हे पद्मपुरस्कार माखले जात आहेत आणि त्याची खंत आज कोणालाही वाटत नाही. सरकारने या पुरस्कारासाठी आता निश्चित स्वरुपाचे निकष ठरविले पाहिजेत. वेळ पडली तर यासाठी स्वतंत्र निवड समिती स्थापन केली पाहीजे अथवा देशाच्या सामान्य नागरिकांकडूनही नावे मागविली गेली पाहिजेत, तरच या पुरस्कारांचे महत्त्व टिकून राहिल.